## MAHARASHTRA ACT No. XVIII OF 1991.

## THE BOMBAY RENTS, HOTEL AND LODGING HOUSE RATES CONTROL (EXTENTION OF DURATION) ACT, 1991.

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राष्ट्रपती यांची संमती दिनांक ९ एप्रिल १९९१ रोजी मिळाली असल्यामुळे तो, याद्वारे, सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**डी. एन. चौधरी,**
प्रधानसचिव, महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

## MAHARASHTRA ACT No. XVIII OF 1991.

## AN ACT TO EXTEND THE DURATION OF THE BOMBAY RENTS, HOTEL AND LODGING HOUSE RATES CONTROL ACT, 1947.

[राष्ट्रपती यांची संमती मिळाल्यानंतर "महाराष्ट्र शासन राजपत्रात" दिनांक १२ एप्रिल १९९१ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला.]

## सन १९९१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८.

**मुंबई भाडे नियंत्रण आणि हॉटेल व निवासगृह दर नियंत्रण अधिनियम, १९४७ याची मुदत वाढवण्यासाठी अधिनियम.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते;

१९४७ चा मुंबई ५७. आणि **ज्याअर्थी,** मुंबई भाडे नियंत्रण आणि हॉटेल व निवासगृह दर नियंत्रण अधिनियम, १९४७ याची मुदत वाढवण्याकरिता महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तातडीने कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक झाले होते अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री झाली होती; आणि म्हणून त्यांनी दिनांक २ मार्च १९९१ रोजी मुंबई भाडे नियंत्रण आणि हॉटेल व निवासगृह दर नियंत्रण (मुदत वाढवणे) अध्यादेश, १९९१ प्रख्यापित केला होता;

१९९१ चा महा. अध्या. क्र. ८.

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणे इष्ट आहे; **त्याअर्थी आता,** भारतीय गणराज्याच्या बेचाळिसाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

१. (१) या अधिनियमास मुंबई भाडे नियंत्रण आणि हॉटेल व निवासगृह दर नियंत्रण (मुदत वाढवणे) अधिनियम, १९९१ असे म्हणता येईल. संक्षिप्त नाव व प्रारंभ.

(२) तो २ मार्च १९९१ पासून अमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन १९४७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५७ याच्या कलम ३ ची सुधारणा.

२. मुंबई भाडे नियंत्रण आणि हॉटेल व निवासगृह दर नियंत्रण अधिनियम, १९४७ याच्या कलम ३ मध्ये, पोट-कलम (२) मधील "१९९१" या आकड्याऐवजी "१९९६" हा आकडा दाखल करण्यात येईल. १९४७ चा मुंबई ५७.

सन १९९१ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ८ याचे निरसन व व्यावृत्ती.

३. (१) मुंबई भाडे नियंत्रण आणि हॉटेल व निवासगृह दर नियंत्रण (मुदत वाढवणे) अध्यादेश, १९९१ हा याद्वारे निरसित करण्यात येत आहे.

(२) असे निरसन करण्यात आले असले तरीही, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमान्वये करण्यात आलेली कोणतीही गोष्ट किंवा कार्यवाही ही (आणि काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना किंवा आदेशसुध्दा) या अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमान्वये करण्यात आली असल्याचे किंवा यथास्थिति काढण्यात आला असल्याचे मानण्यात येईल.

(यथार्थ अनुवाद)

**प. ग. पाटील,**
भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य.